**ठळक बातम्या**

- अमली पदार्थमुक्त युवा ही मोहीम म्हणजे देशाच्या युवा वर्गाच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा सामूहिक संकल्प असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बातमध्ये प्रतिपादन

- नेपाळमध्ये काठमांडू इथं अडकलेले नागपूरचे १०२ यात्रेकरू सुरक्षित परतले

- राज्य सरकारने सर्व मराठ्यांना कुणबी म्हणून घोषित करावं, अशी मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांची मागणी

**आणि**

- महिलांच्या आशिया चषक टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत भारताचा सामना थायलंडशी होणार

**<><><><><>**

‘विकसित भारतासाठी अमली पदार्थमुक्त युवा’ ही मोहीम म्हणजे देशाच्या युवा वर्गाचं आरोग्य, आनंद आणि उज्ज्वल भविष्यासाठीचा सामूहिक संकल्प असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधत होते. हा या कार्यक्रमाचा एकशे सदतीसावा भाग होता. युवा पिढी आणि अमली पदार्थमुक्त भारत हे या उपक्रमाचं उद्दिष्ट असून, या मोहिमेत देशाची युवा पिढी मोठ्या संख्येनं सहभागी झाल्याचं त्यांनी सांगितलं. अमली पदार्थांच्या व्यसनाचे परिणाम संपूर्ण कुटुंब आणि समाजालाही भोगावे लागतात असं ते म्हणाले. अमली पदार्थांविरोधात जनजागृती करणाऱ्यांचं तसंच या व्यसनाशी झुंज देणाऱ्यांना मदत करणाऱ्यांची त्यांनी प्रशंसा केली. ही मोहीम प्रभावी ठरावी यासाठी देशातल्या ‘आशय निर्मात्यांनी’ विविध भाषांच्या माध्यमातून योगदान द्यावं, तसंच यासाठी ‘नशामुक्त युवा’ हा ‘हॅशटॅग’ वापरावा, असं आवाहनही त्यांनी केलं.

राष्ट्रीय हातमाग दिन, भारत छोडो आंदोलन स्मृतिदिन, फाळणी वेदना स्मृती दिन, स्वातंत्र्य दिन आणि राष्ट्रीय अंतराळ दिन यामुळे ऑगस्ट महिना विशेष ठरल्याचं त्यांनी सांगितलं. या काळात प्रत्येकाच्या हृदयातली देशभक्तीची भावना अधिक दृढ झाली असं ते म्हणाले. यंदा ‘वंदे मातरम्’ या राष्ट्रीय गीताला दीडशे वर्षे पूर्ण होत असल्यानं हे वर्ष अधिक महत्त्वाचं आहे, असं ते म्हणाले. ‘हर घर तिरंगा’ मोहिमेअंतर्गत यंदा ८ कोटींपेक्षा जास्त

'सेल्फी-विथ-तिरंगा' अपलोड झाल्याची माहिती त्यांनी दिली. 'सूर्यपथ तिरंगा' या उपक्रमामुळे हा उत्सव जगभरात पोहोचल्याचं ते म्हणाले. या प्रयत्नांमुळे समाज एकत्र येतो आणि देशाशी असलेलं नातं अधिक दृढ होतं असं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट - MKB SURYAPATH**

देशभरात लाखो महिला व्यावसायिक असून, भांडवलाच्या अभावामुळे त्यांच्या व्यवसायाची प्रगती होत नाही. मात्र आता 'प्रधानमंत्री स्वनिधी' योजनेमुळे अशा लाखो महिलांना नवं बळ मिळू लागलं आहे असं ते म्हणाले. या योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचं प्रमाण जवळजवळ ४६ टक्के आहे, सुमारे ३५ लाख महिला या योजनेमुळे आपल्या व्यवसायाचा विस्तार करू लागल्या आहेत अशी माहिती त्यांनी दिली. यानिमित्तानं देशभरातल्या विविध यशोगाथाही त्यांनी श्रोत्यांसमोर मांडल्या. जेव्हा एखाद्या स्त्रीनं सुरु केलेला व्यवसाय वाढतो, तेव्हा तिच्या संपूर्ण कुटुंबाची प्रगती होते, आणि महिलांचा आत्मविश्वास वाढतो, असं ते म्हणाले. महिला सक्षमीकरणाचं हे एक उदाहरण असल्याचं त्यांनी सांगितलं.

देशाच्या कन्यांची स्वप्न देखील आज अवकाशात झेप घेत असल्याचं सांगून, भारताच्या 'मिशन शक्तीसॅट' या अभियानाची माहिती त्यांनी दिली. या अभियानाचा दुसरा टप्पा सुरु झाला असून, विद्यार्थिनींच्या सहभागानं तयार केलेला एक उपग्रह चंद्राच्या कक्षेत पाठवण्याची तयारी सुरू आहे, अशी माहिती त्यांनी दिली. या अभियानात सहभागी झालेल्या अनेक विद्यार्थिनी भविष्यात विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रात स्वतःची एक नवी ओळख निर्माण करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ऐतिहासिक माहिती रंजकपणे मांडता यावी, यासाठी मुंबईतल्या कृष्ण शेषाद्री यांनी भारत राज्य या संकेतस्थळाच्या माध्यमातून केलेला अभिनव प्रयत्न समजून घेण्यासाठी प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बातमध्ये त्यांच्याशी संवाद साधला.

स्वच्छतेच्या महत्वाबाबत बोलताना ते म्हणाले की, जेव्हा आपण एखादं ठिकाण स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करतो, तेव्हा त्या जागेची संपूर्ण ओळख बदलते.

निसर्गाचं रक्षण करण्याबरोबरच आपलं जगणं समृद्ध होऊ शकतं असा विचार त्यांनी मांडला. यादृष्टीनं त्यांनी वनसंवर्धन आणि उपजिवीकेचा समतोल साधणारी देशभरातली प्रेरक उदाहरणं श्रोत्यांसमोर मांडली.

शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवणाऱ्या ‘अवोकाडो’ या फळाच्या लागवडीसह, कृषी क्षेत्रातल्या यशस्वी प्रयोगांविषयी देखील त्यांनी सांगितलं.

येत्या ३ सप्टेंबर रोजी, देश अभिनेता ‘उत्तम कुमार’ यांची जन्मशताब्दी साजरी करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. उत्तम कुमार यांच्या जीवनातून कधीही हार न मानण्याची शिकवण मिळते असं ते म्हणाले.

आपले सण आणि उत्सव, आपल्याला परंपरांबरोबरच परस्परांशी जोडले जाण्याची संधीही देतात, असं ते म्हणाले. आगामी सण उत्सवांच्या काळात स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी ‘व्होकल फॉर लोकल’ या मंत्राचा अंगिकार करण्याचं आवाहन त्यांनी केलं. भारतीय वस्तूंचा अभिमानानं स्वीकार केल्यानं आत्मनिर्भर भारताचा मार्ग अधिक प्रशस्त होईल असं ते म्हणाले.

<><><><><>

नेपाळमधल्या नैसर्गिक आपत्तीमुळे काठमांडू इथं अडकलेले नागपूरचे १०२ यात्रेकरू आज सकाळी सुरक्षितपणे राज्यात परतले. विदर्भातले आणखी ४ यात्रेकरू काल नागपूर इथं पोहोचले.

नेपाळमधल्या महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ७३४ वर पोहोचली असून जवळजवळ अडीच हजार लोक अद्याप बेपत्ता आहेत. यामध्ये ८५ सुरक्षा कर्मचारी आणि ३२० परदेशी नागरिकांचा समावेश आहे. या नैसर्गिक आपत्तीनंतर सलग पाचव्या दिवशी पुराचा तडाखा बसलेल्या आठही जिल्ह्यांमध्ये बचाव कार्य सुरु आहे. आतापर्यंत बाधित जिल्ह्यांमधून २२७ परदेशी नागरिकांसह ८ हजार १८६ लोकांना सुरक्षित स्थळी हलवल्याची माहिती राष्ट्रीय आपत्ती जोखीम निवारण आणि व्यवस्थापन प्राधिकरणानं दिली.

'भोटे कोशी' नदीला पूर येण्याची शक्यता लक्षात घेता, नेपाळ सरकाने रसुवा, नुवाकोट आणि धाडिंग या जिल्ह्यांमधल्या नदीलगतच्या भागातल्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा जारी केला आहे.

नेपाळमधल्या पूरग्रस्त भागातून आतापर्यंत १०८ भारतीय नागरिकांची सुटका करण्यात आली असून, ५० नागरिकांशी पुन्हा संपर्क प्रस्थापित झाल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं. २७५ भारतीय नागरिक अद्याप बेपत्ता असल्याचं त्यांनी सांगितलं.

गेल्या दोन दिवसांत ५९८ भारतीय नागरिकांनी चीनमधून नेपाळमध्ये प्रवेश केला, तर ९०० भारतीय नागरिक चीनमध्ये सुरक्षित असून, बीजिंगमधला भारतीय दूतावास स्थानिक प्रशासनाच्या माध्यमातून त्यांच्या संपर्कात आहे.

नेपाळमधल्या बचाव आणि मदत कार्यासाठी भारतातून ११ टन मदतसामग्री घेऊन चौथं विमान काठमांडूमध्ये दाखल झालं असून, ही मदतसामग्री नेपाळ सरकारकडे सुपूर्द करण्यात आल्याचं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी सांगितलं.

नेपाळ-तिबेट सीमेवरच्या पर्वतरांगांमध्ये गेल्या बुधवारी हिमनदीचा मोठा भाग दरीत कोसळून आलेल्या महापुरात नेपाळमधली शहरं आणि गावं उद्ध्वस्त झाली, महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचं नुकसान झालं आणि जलविद्युत केंद्र वाहून गेली.

<><><><><>

राज्य सरकारने मराठा समाजाला सरसकट कुणबी म्हणून घोषित करावं, अशी मागणी मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी आज वार्ताहरांशी बोलताना केली. ही मागणी पूर्ण झाली नाही, तर मुंबईपर्यंत मोर्चा काढण्याचा आणि आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला. जरांगे यांनी आंतरवाली सराटी इथं पुन्हा सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे. मराठा समुदायाच्या मुख्य समितीची बैठक १२ सप्टेंबर रोजी आंतरवाली सराटी इथं होणार असून मुंबईत उपोषण करण्याबाबतचा निर्णय या बैठकीत घेतला जाईल, तोपर्यंत सरकारनं आपल्या मागण्या मान्य कराव्यात, असं त्यांनी सांगितलं. जरांगे यांच्या समर्थनार्थ मराठा समाजाचे सदस्य मोठ्या प्रमाणात आंतरवाली सराटी इथं जमले आहेत.

<><><><><>

आशिया चषक T20 क्रिकेट स्पर्धेत आज भारतीय महिला संघाचा सामना थायलंड बरोबर होणार आहे. दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर भारतीय वेळेनुसार रात्री साडे आठ वाजता हा सामना सुरू होईल. हरमनप्रीत कौर भारतीय संघाचं नेतृत्व करेल, तर स्मृती मंधाना उपकर्णधार असेल.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि उझबेकिस्तानचे अध्यक्ष शौकत मिर्झियोएव्ह यांच्यात आज ताश्कंद मध्ये शिष्टमंडळ-स्तरावर चर्चा झाली. प्रधानमंत्री मोदी उझबेकिस्तानच्या दोन दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर आहेत.

//<><><><><>//